# ३) पइट्ठाण-णअरं

'लीलावईकहा' (लीलावतीकथा) या नावाचे महाकाव्य महाकवी कुतूहल/कौतूहल (कोऊहल) याने लिहिले आहे. या कवीबद्दल खात्रीलायक अशी फारशी माहिती मिळत नाही. परंतु काही साहित्यिकांच्या कृतींमध्ये कुतूहल/कौतूहल कवीबद्दल जे संदर्भ मिळतात, त्यावरून या कवीचा काळ इ.स. ८०० मानता येतो. 'लीलावईकहा' या काव्यात कवीने स्वतःचा परिचय दिला नसला तरी त्याचे आजोबा बहुलादित्य व वडील भूषणभट्ट यांचा परिचय दिला आहे. आजोबा बहुलादित्य हे तीन वेदांमध्ये पारंगत असून होमहवनाद्वारे त्यांनी देवतांना संतुष्ट केले होते. तसेच धर्म, अर्थ, काम हे तीनही पुरुषार्थ प्राप्त केले होते. त्याचप्रमाणे भूषणभट्ट हे चारही वेदांमध्ये पारंगत असून समाजामध्ये आदरणीय होते, असे संदर्भ सापडतात.

या काव्याची नायिका लीलावती ही सिंहल द्वीपाची (सध्याचे श्रीलंका) राजकन्या आहे. या पाठामध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र पैठणची माहिती आली आहे.

पलय-वराह-समुद्धरण,-सोक्ख-संपत्ति-गरुय-भावाए।
णाणा-विह-रयणालंकियाए, भयवईए पुहईए।।१।।

णीसेस-सस्स-संपत्ति,-पमुइयासेस-पामर-जणोहो।
सुव्वसिय-गाम-गोहण,-भंभारव-मुहलिय-दियंतो।।२।।



अइ-सुहिय-पाण-आवाण,-चच्चरी-रव-रमाउलारामो।
णीसेस-सुह-णिवासो, आसय-विसओ त्ति विक्खाओ।।३।।

जो सो अविउत्तो कय-जुयस्स, धम्मस्स संणिवेसो व्व।
सिक्खा-ठाणं व पयावइस्स, सुकयाण आवासो।।४।।

सासणमिव पुण्णाणं, जम्मुप्पत्ति व्व सुह-समूहाणं।
आयरिसो आयाराण, सइ सुछेत्तं पिव गुणाणं।।५।।

अच्छउ ता णिय-छेत्तं, सेसाइं वि जत्थ पामर-वहूहिं।
रक्खिज्जंति मणोहर,-गेयारव-हरिय-हरिणाहिं।।६।।

इय एरिसस्स सुंदरि मज्झम्मि, सुजणवयस्स रमणीयं।
णीसेस-सुह-णिवासं, णअरं णामं पइट्ठाणं।।७।।

जणग्गि-धूम-सामलिय,-णहयलालोयणेक्क-रसिएहिं।
णच्चिज्जइ ससहर-मणि,-सिलायले घर-मयूरेहिं।।८।।

ण तरिज्जइ घर-मणि-किरण,-जाल-पडिरुद्ध-तिमिर-णियरम्मि।
अहिसारियाहिं आमुक्क,-मंडणाहिं पि संचरिउं।।९।।

साणूर-थूहिया-धय-,णिरंतरंतरिय-तरणि-कर-णियरे।
परिसेसियायवत्तं, गम्मइ संगीय-विलयाहिं।।१०।।

सरसावराह-परिकुविय,-कामिणी-माण-मोह-लंपिक्कं।
कलयंठि-उलं चिय कुणइ, जत्थ दोच्चं पियाण सया।।११।।

अह णवर तत्थ दोसो जं, वियसिय-कुसुम-रेणु-पडलेण।
मइलिज्जंति समीरण-वसेण, घर-चित्त-भित्तीओ।।१२।।

तत्थेरिसम्मि णयरे, णीसेस-गुणावगूहिय-सरीरो।
भुवण-पवित्थरिय-जसो, राया सालाहणो णाम।।१३।।

जो सो अविग्गहो वि हु, सव्वंगावयव-सुंदरो सुहओ।
दुद्दंसणो वि लोयाण, लोयणाणंद-संजणणो।।१४।।

सूरो वि ण सत्तासो, सोमो वि कलंक-वज्जिओ णिच्चं।
भोई वि ण दोजीहो, तुंगो वि समीव-दिण्ण-फलो।।१५।।

## सद्दत्था

**पलयवराह** – प्रलयकाळी पृथ्वीला उचलून धरणारा वराह
**समुद्धरण** – वर काढणे
**सोक्खसंपत्ति** – सुख-संपत्ती
**रयणालंकियाए** – (रयण + अलंकियाए) रत्नांनी अलंकृत झालेल्या
**पामरजणोहो** – शेतकरी किंवा सामान्य नागरिकांचा ओघ
**सुव्वसियगाम** – चांगल्या तऱ्हेने वसलेले गाव
**गोहण** – गोधन, गायरूपी धन
**भंभारव** – (गाईंच्या) हंबरण्याचा आवाज
**आवाण** – जास्त पिणे
**चच्चरी** – गायनासहित असलेले नृत्य
**आसयविसओ** – अश्मकविषय (म्हणजेच महाराष्ट्र देश)
**कयजुयस्स** – सत्ययुगाचे
**संणिवेसो** – आश्रयस्थान
**सुकयाण** – चांगले काम करणाऱ्यांचे
**जम्मुप्पत्ति** – (जम्म+उप्पत्ति) जन्म व उत्पत्ती
**आयरिसो** – आदर्श, आरसा
**सइ** – (अव्यय) सदा, नेहमी
**सुछेत्तं** – चांगले क्षेत्र/योग्य जागा
**णियछेत्तं** – स्वतःचे शेत
**पामरवहूहिं** – सामान्य लोकांच्या पत्नींकडून
**गेयारव** – गाण्याचे आवाज

**पइट्ठाणं** – पैठण (महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र)
**जण्णग्गिधूम** – यज्ञातून उत्पन्न झालेला अग्नी आणि धूर
**सामलियणहयलालोयणेक्करसिएहिं** – अंधारून आलेले आकाश बघण्यात मग्न केकारव करणाऱ्या (मोरांनी)
**ससहरमणि** – चंद्रकांत मणी
**सिलायले** – दगडाच्या फळीवर
**घरमयूरेहिं** – घरातील (पाळीव) मोरांनी
**तरिज्जइ** – अशक्य होते
**पडिरुद्ध** – अडविलेले
**तिमिरणियरम्मि** – अंधाराच्या समूहामध्ये, दाट अंधारामध्ये
**अहिसारियाहिं** – अभिसारिकांनी (प्रियकराला गुप्तपणे भेटायला जाणाऱ्या नायिका)
**साणूए** – देवालय
**थूहिया** – स्तूप
**परिसेसियायवत्तं** – सूर्याच्या किरणांपासून बचाव करण्यासाठी डोक्यावर धारण केलेले छत्र बाजूला करून/त्या छत्राशिवाय
**संगीयविलयाहिं** – संगीतामध्ये रमलेल्या स्त्रियांकडून, गायिकांकडून
**सरसावराह** – रममाण झाल्यामुळे घडलेला अपराध
**लंपिक्क** – हरण करणारा
**कलयंठिउलं** – कोकिळांचा समूह किंवा कुटुंब
**दोच्चं** – दूत कर्म
**वियसियकुसुमरेणुपडलेण** – फुललेल्या फुलांच्या रज:कणांच्या पटलाने
**मइलिज्जंति** – मलीन होतात.
**समीरणवसेण** – वाऱ्याच्या प्रभावामुळे
**णीसेसगुणावगूहियसरीरो** – सर्व गुणांनी युक्त असे शरीर धारण केलेला
**भुवणपवित्थरियजसो** – पृथ्वीवर विस्तृत यश असणारा
**अविग्गहो** – अशरीरी; पण इथे युद्धादी कलह ज्याला मान्य नाहीत असा
**दुद्दंसणो** – दुर्दर्शन, ज्याचे दर्शन होणे कठीण आहे असा
**सूरो** – सूर्य, शूर, पराक्रमी
**ण सत्तासो** – सात अश्व नसणारा (सूर्याच्या रथाला सात घोडे असतात असे मानले जाते), त्रास न देणारा
**सोमो** – चंद्र, सौम्य
**कलंकवज्जिओ** – कलंक नसणारा, निष्कलंक
**भोई** – साप, भोग घेणारा
**दोजीहो** – दोन जीभा असणारा, दुटप्पी वागणारा
**तुंगो** – उंच, ज्याची समाजात प्रतिष्ठा आहे, विरोधकरहित आहे असा, याच्यापेक्षा मोठी प्रतिष्ठा नसणारा
**समीवदिण्णफलो** – त्वरित फळ देणारा

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) ण तरिज्जइ ...... संगीय-विलयाहिं ।।
२) अह णवर ...... सालाहणो णाम।।
३) पलय-वराह- ...... -मुहलिय-दियंतो।।
४) जो सो अविउत्तो ...... आवासो।।
५) सासणमिव पुण्णाणं, ...... पिव गुणाणं।।

**२) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) भगवती पृथ्वीचे वर्णन करा.
२) 'घराच्या भिंती मलीन झाल्या' हे स्पष्ट करा.
३) शेतांचे रक्षण करणाऱ्यांचे वर्णन करा.
४) प्रतिष्ठान (पैठण) नगरीच्या राजाचे नाव व विशेषणे लिहा.

**३) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) प्रतिष्ठान नगरीचे वर्णन करा.
२) अश्मक देशाचे वर्णन करा.


**४) खालील गाथेतील श्लेष स्पष्ट करा.**

सूरो वि ण सत्तासो, सोमो वि कलंक-वज्जिओ णिच्चं।
भोई वि ण दोजीहो, तुंगो वि समीव-दिण्ण-फलो।।

**६) खालील धातूंची पाठात आलेली कर्मणी रूपे शोधून पुढील तक्ता पूर्ण करा.**

| धातू | कर्मणी रूप | व्याकरण |
|---|---|---|
| तर | | |
| मइल | | |
| रक्ख | | |
| पडिराव | | |
| णच्च | | |
| अहिलस | | |

**७) कृती करा.**




**८) समास ओळखून विग्रह करा.**

| | |
|---|---|
| रयणालंकिया – | |
| सस्ससंपत्ती – | |
| अविउत्तो – | |
| पयावई – | |
| सुकयाण – | |
| जणग्गी – | |
| सिलायले – | |
| कुसुमरेणुपडलेण – | |
| लोयणाणंदो– | |
| दुद्दंसणो– | |

**९) पाठातील उपसर्गसहित रूपांची यादी करून उपसर्ग, धातू व प्रत्यय वेगवेगळे करा.**

| उपसर्ग | धातू | प्रत्यय |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**१०) पाठात आलेली 'य'श्रुतीची उदाहरणे देवून 'य'श्रुतीचा नियम स्पष्ट करा.**